**प्रेस नोट** **दि.१८/०७/२०१९**

## खडकी पोलीस स्टेशन पुणे शहर

## वस्तीगृहातुन पळुन जाणारे मुलास वस्तीगृह चालकाचे ताब्यात दिले

आज दि.१८/०७/२०१९ रोजी दुपारी १५/०० वा. चे सुमारास वाकडेवाडी शिवाजीनगर, पुणे येथे मरिआई बिट मार्शल चे पोलीस कर्मचारी पो. शि. १०५०१ साबळे, पो.ना. ६६२५ न्यायनित खडकी पोलीस स्टेशन पुणे शहर हे पेट्रोलींग करीत असताना त्यांना वाकडेवाडी पुलाजवळ एक मुलगा संशयीतरित्या घाबरलेल्या स्थितीत फिरत असताना दिसला. सदर मुलाकडे नमुद पोलीस कर्मचारी यांनी त्याचे नाव पत्त्या बाबत विचारणा केली असता तो घाबरुन रडु लागला. त्यावर सदर मुलास नमुद पोलीस कर्मचारी यांनी मरिआई पोलीस चौकीस आणले. सदर पोलीस चौकीचे चौकी अधिकारी श्री एस.व्ही.पवार,पोलीस उप निरीक्षक, खडकी पो. स्टे.पुणे व डयुटी अंमलदार पो.हवा. २६९३ चोरगे यांनी सदर मुलास विश्वासात घेवुन चौकशी केली त्याचे वय १३ वर्षे रा. अमरावती (सध्या वनवासी विद्यार्थी वस्तीगृह,राजगुरुनगर, पुणे) असे असल्याचे समजले. तसेच सदर मुलाचे पालक हे अमरावती येथे राहणेस असुन त्यास शिक्षणासाठी वनवासी विद्यार्थी वस्तीगृहात ठेवले असल्याचे समजले. तसेच तो मुलगा सध्या हुतात्मा राजगुरु विद्यालय, राजगुरुनगर, पुणे या शाळेमध्ये ८ वी चे वर्गात शिक्षण घेत असल्याचे समजले. सदर मुलास दि. १८/०७/२०१९ रोजी नेहमीप्रमाणे वस्तीगृह चालकाने शाळेत पाठवीले असता तो शाळेत न जाता नजर चुकवुन राजगुरुनगर बस स्थानक येथे गेला व तेथुन त्याने पुणे बसमध्ये बसुन पुण्यात आला. पुण्यात तो वाकडेवाडी शिवाजीनर येथे उतरला परंतु त्याला पुढे कोठे जायचे हे कळत नसल्याने तो वाकडेवाडी भागात फिरत होता.

प्राप्त माहितीचे आधारे पोलीस उप निरीक्षक श्री पवार तसेच पो. हवा. चोरगे व पो. ना. न्यायनित यांनी सदर मुलाचे आई चा मोबाईल नंबर प्राप्त करुन त्यावरुन त्यांचेशी संपर्क साधला व त्यांना त्याबाबत कल्पना दिली असता त्यांनी त्यास सदर वस्तीगृह चालकाचे ताब्यात देणेबाबत कळवीले. त्यावरुन नमुद वस्तीगृह चालक नामे अमोल सुधाकर डंमरे यांना फोनव्दारे संपर्क साधुन त्यांना समक्ष मरिआई पोलीस चौकी येथे बोलावुन घेतले व सदर मुलाबाबत खात्री झालेनंतर सदर मुलास श्री अमोल सुधाकर डंमरे यांचे ताब्यात सुखरुप देणेत आले आहे.

एकंदरीत मरिआई बिट मार्शल चे पोलीस कर्मचारी पो. शि. १०५०१ साबळे, पो.ना. ६६२५ न्यायनित खडकी पोलीस स्टेशन पुणे शहर तसेच पोलीस उप निरीक्षक श्री पवार, पो. हवा. २६९३ चोरगे यांनी प्रसंगावधान बाळगुन घटनेचे गांभिर्य लक्षात घेवुन तात्काळ कौशल्यपुर्णरित्या चौकशी करुन सदर पिडीत मुलाची दखल घेतली व त्यास सुखरुप वस्तीगृह चालकाचे ताब्यात दिले आहे. सदर पोलीस कर्मचारी यांनी अत्यंत उत्कृष्ठ व उल्लेखनिय कामगीरी करुन सामान्य जनमानसात पोलीस खात्याची प्रतीमा उंचावणेचे अनुषंगाने प्रयत्न केले आहेत.

(भागवत मिसाळ)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
खडकी पोलीस स्टेशन, पुणे.